अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. २ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३०४ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

यंदाच्या वर्षी विक्रमी आयटीआर दाखल

मुंबई : आयकर विवरण दाखल करण्याची मुदत सोमवारी, ३१ जुलै २०२३ रोजी संपली. यंदाच्या वर्षात आयकर विवरण दाखल करणाऱ्यांच्या संख्येत विक्रमी वाढ झाली आहे.

३१ जुलै २०२३ पर्यंत एकूण ६.७७कोटी करदात्यांनी आयकर रिटर्न भरले आहेत. आयकर विभागाने ही माहिती दिली आहे. मूल्यांकन वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण ६.७७ कोटी खढठ दाखल करण्यात आले होते तर २०२२-२३ मध्ये ३१ जुलै २०२२ पर्यंत एकूण ५.८३ कोटी खढठ दाखल करण्यात आले होते. याचाच अर्थ २०२२-२३ च्या मूल्यांकन वर्षाच्या तुलनेत २०२३-२४ मध्ये १६.१ टक्के अधिक आयकर रिटर्न भरले गेले आहेत. आयकर विभागाने सांगितले की, ३१ जुलै २०२३ रोजी एकाच दिवसात ६४.३३ लाख आयकर रिटर्न भरले गेले. ५३.६% लाख जणांनी पहिल्यांदाच आयकर रिटर्न दाखल केले आहेत. टॅक्सबेसच्या संख्येत चांगली वाढ झाली असल्याचे हे संकेत असल्याचे म्हटले जात आहे. कर विभागाने सांगितले की, ६.७७ कोटी आयकर रिटर्नपैकी ४९.१८ टक्के किंवा ३.३३ कोटी करदात्यांनी आयटीआर-१ फॉर्मद्वारे रिटर्न भरले आहेत. ८१.१२ लाख किंवा ११.९% टक्के करदात्यांनी खढठ-२ द्वारे रिटर्न भरले आहेत. ७५.४० लाख किंवा ११.१३ टक्के करदात्यांनी आयटीआर-३ द्वारे आयकर रिटर्न भरले आहेत.

मोदींनी हात दिला, पवारांनी पाठ थोपटली सुशीलकुमारांच्या एन्ट्रीने भुवया उंचावल्या

पुण्यात 'टोलेबाजी' ऐवजी बरसली प्रेमाची 'फुलबाजी'

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केवळ पुणेकरांचीच नव्हेतर अख्या राज्यातील मराठी माणसांची मने जिंकली. मध्यंतरीच्या काळात राज्यात बरीच राजकीय उलथापालथ झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर मोदी आणि शरद पवार पुण्यातील कार्यक्रमात एकाच मंचावर एकत्र येणार म्हटल्यानंतर राजकीय जुगलबंदी रंगणार काय? याकडे राज्याचे लक्ष लागून होते. मोदी आणि पवार हे दोघेही हजरजबाबी. टोलेबाजी होणार की खेळीमेळीची फुलबाजी उडणार याकडेही राज्याच्या नजरा खिळल्या होत्या. पण मंचावर एकमेकांविषयी आदर, आपुलकी,खळखळून हसणे, अशा प्रेमाचे- एकीचे सुरम्य अलभ्य दर्शन राज्याला घडले. मंचावर येताच मोदींनी पवारांना हात दिला. पवार मनमोकळेपणाने हसले. त्यांनी मोदींची पाठही थोपटली. विशेष म्हणजे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा सोलापूरचे सुपुत्र सुशीलकुमार शिंदे यांची एकाकी एन्ट्री झाल्याने रसिकांच्या दृष्टीने दुधात साखर पडली पण महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या.

मोदी यांचा पुण्यात लोकमान्य टिळक पुरस्काराने सन्मान करण्यात आला. लोकमान्यांची ओळख असलेली पुणेरी पगडी आणि उपरणे व एक लाख रुपये देऊन मोदींचा गौरव करण्यात आला. मोदी यांनी मंचावरील लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यास अभिवादन केल्यानंतर उपस्थित मान्यवरांची भेट घेतली. मंचावरील शरद पवार यांच्याजवळ आल्यानंतर मोदींनी स्वत: पुढाकार घेत हस्तोंदलन करण्यासाठी हात पुढे केला. यानंतर पवार यांनी देखील प्रतिसाद दिला. मोदी हे सुशीलकुमार शिंदे यांना भेटण्यासाठी जात असताना पवार यांनी दोनवेळा मोदींची पाठ थोपटली. मोदी यांना देण्यात येणाऱ्या पुरस्कार सोहळ्यास शरद पवार यांनी उपस्थित राहू नये, अशी भूमिका महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून घेण्यात आली होती. मात्र, काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यांकडून शरद पवार यांनी सोहळ्यास उपस्थित राहण्याबद्दल वेगळा विचार करावा, अशी भूमिका घेण्यात आली होती. मात्र, सुशीलकुमार शिंदे हे या सोहळ्यास उपस्थित राहिले. शिंदे यांच्या उपस्थितीने रसिकांसाठी दुधात साखर पडली पण आघाडीतील नेत्यांच्या भुवया उंचावल्या गेल्या.

झेंड्याची 'ऐसी'-'तैसी'

मोदी पुण्यात असताना त्यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. या दरम्यान एक समान गोष्ट जी पुढे आली ती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या झेंड्याची! जिथे मोदींच्या प्रवासाच्या वाटेवर भाजप पक्षाचे कमळ, शिवसेना शिंदे गटाचे धनुष्यबाण आणि त्याचबरोबर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे घड्याळ असलेले झेंडे शेजारी-शेजारी झळकत होते. दुसरीकडे 'गो बॅक मोदी' आंदोलनात लागलेले राष्ट्रवादीचे झेंडे वेगळीच कहाणी सांगत होते.

पाच दिग्गज एकत्र : राष्ट्रवादीतील फुटीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शरद पवार पहिल्यांदाच एका मंचावर आले. शरद पवार, नरेंद्र मोदी, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार या महाराष्ट्राच्या राजकारणाभोवती फिरणाऱ्या पाच महत्त्वाच्या व्यक्ती एकाच वेळी एकाच मंचावर एकत्र आल्याने अख्ख्या देशाचे लक्ष या सोहळ्याकडे लागून राहिले होते. भाषण करताना प्रोटोकॉलनुसार शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव घेतले. शरद पवार यांच्यासह विरोधकांनी मोदींच्या विरोधात 'इंडिया' आघाडीची स्थापना केल्यानंतर पवार-मोदी एकाच मंचावर येणे महत्त्वाचे मानले जाते. महाविकास आघाडीतील नेत्यांच्या विरोधानंतरही पवारांनी या सोहळ्याला उपस्थिती लावली.

अन् दादांनी वाट बदलली... : मुख्यमंत्री शिंदे आणि फडणवीस यांनी पवारांची भेट घेतली, मात्र अजित पवारांनी त्यांच्या पुढेही जाणे टाळले. यानंतर अजितदादांनी आपली वाट बदलली. कार्यक्रमासाठी शरद पवार १५ मिनिटे अगोदर पोहचले. तेथे ते एकटेच असताना सुशीलकुमार शिंदे आले. यानंतर शिंदेंसह फडणवीस, पवार आले. व्यासपीठावर येताच शिंदे-फडणवीस थेट पवारांकडे गेले. त्यांना नमस्कार करत आपल्या खुर्चीकडे वळले. दरम्यान, शिंदे-फडणवीस हे पवारांशी बोलत असताना अजित पवार मात्र शरद पवारांच्या मागच्या बाजूने गुपचूप आपल्या खुर्चीकडे गेले आणि स्थानापन्न झाले. पवारांना समोर पाहताच ते थोडेसे गडबडल्याचेही दिसून आले.

८५ दिवसांचा खडतर काळ संपला, आता लक्ष्य धरणाच्या शंभरीकडे

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरणातील पाणी पातळीचा ८५ दिवसांचा खडतर प्रवास मंगळवारी सकाळी संपला आणि उजनीची वाटचाल प्लस पातळीकडे सुरू झाली.आता सोलापूरकरांना उत्सुकता लागून आहे,ती उजनीच्या शंभरीकडे. मंगळवारी दिवसभरात प्लसमध्ये १ टक्का पाण्याची वाढ झाल्याचे सांगण्यात आले. दौंडमधून ११ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येऊन मिसळत आहे.

पाणलोट क्षेत्रात पावसाने पाठ फिरविल्यामुळे गेले ८५ दिवस धरणातील पाण्याची पातळी वजा होती. परंतु उजनी धरणाने मंगळवारी सहा वाजता शून्य पातळी ओलांडल्याने बळीराजासह तमाम सोलापूरकर आनंदित झाले आहेत. राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून वरुणराजाने धुमशान घातले होते. परंतु, उजनी पाणलोट क्षेत्रात मात्र वेगळे चित्र पाहायला मिळत होते. उजनी पाणलोट क्षेत्रात पावसाने पाठ फिरवल्यामुळे यंदा धरण भरणार की नाही, अशी चिंता पुढे आली होती.

आता सोलापूर जिल्हा आणि उजनी पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू होण्याची वाट बळीराजा पाहत आहे. किमान शेवटच्या टप्प्यात जरी जोरदार पाऊस झाला, तर उजनी धरण १०० टक्के भरेल अशी अशा शेतकऱ्यांना आहे. उजनी धरणावर सोलापूर, पुणे, नगर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील बराचसा भाग अवलंबून असल्यानं उजनी धरण पूर्णक्षमतेने भरण्याची वाट पाहत आहेत.

१९ टीएमसी पाणी आले : यंदा पावसाळा निम्मा होत आला तरी उजनी पाणलोटक्षेत्रात समाधानकारक पाऊस न झाल्याने अतिशय संथ गतीने धरणाची पाणी पातळी वाढत चालली होती. गेल्यावर्षी १२ जुलै रोजी धरणाने शून्य पातळी ओलांडली असताना यावेळी मात्र १ ऑगस्टपर्यंत वाट पाहावी लागली आहे. आजपर्यंत धरणात १९.२८ टीएमसी एवढे पाणी जमा झाले.

राज्यात पुढील चार दिवस धो धो कोसळणार

राज्यात पुढील चार ते पाच दिवसात मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. बंगालच्या किनारपट्टीवर निर्माण झालेला तीव्र कमी दाबाचा पट्टा पुढे सरकत असून तो बांगलादेश किनारपट्टी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून उसंत घेतलेल्या पाऊस पुन्हा एकदा धो धो कोसळण्याची शक्यता आहे.

पार्किंगमध्ये लावलेल्या आयशर टेम्पोत ड्रायव्हरची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

पार्किंगमध्ये लावलेल्या आयशर टेम्पो मध्ये एका अविवाहित ड्रायव्हरने गळफास येऊन आत्महत्या केली. ही घटना जुना पुणे नाका परिसरातील बसवंती पार्किंगच्या मैदानात मंगळवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली .

दत्तात्रय भीमाशंकर रगटे (वय २४ रा. कुरघोट ता.दक्षिण सोलापूर) असे मयत झालेल्या ड्रायव्हरचे नाव आहे. आज दुपारी अडीच वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह स्वतःच्या एमएच१३-एक्स ४६१८ या आयशर टेम्पोच्या पाठीमागच्या हौदातील अँगलला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयाकडे पाठवून दिला. दत्तात्रय रगटे हा त्याच्या आयशरवर ड्रायव्हर म्हणून काम करतो. त्याच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार दराडे पुढील तपास करीत आहेत.

माध्यमिक शिक्षणाधिकारीपदी मारुती फडके

तीन प्रभारीनंतर मिळाला अधिकारी

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागाला. तीन प्रभारी अधिकाऱ्यां नंतर मिळाला पूर्ण वेळ शिक्षण अधिकारी शासनाने लातूर शिक्षण विभागाचे सहसचिव मारुती फडके यांची सोलापूर जिल्हा परिषद माध्यमिक विभागात माध्यमिक शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

पूर्णवेळ अधिकारी मिळाल्याने माध्यमिक शिक्षण विभागाचे प्रभारी अधिकाऱ्याचे ग्रहण अखेर संपले आहे.तत्कालीन शिक्षणाधिकारी भास्करराव बाबर यांची सात फेब्रुवारी रोजी पुणे येथे बदली झाल्यानंतर तेव्हापासून माध्यमिक शिक्षणाधिकारी हे पद रिक्त होते. त्यानंतर योजना शिक्षणाधिकारी सुलभा वटारे यांच्याकडे पदभार देण्यात आला. टप्पा अनुदान वेळी गोंधळ झाल्याने वटारे यांचा पदभार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी काढून त्यांच्या जागेवर महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रमाधिकारी जावेद शेख यांच्याकडे पदभार दिला होता. अडीच महिन्यानंतर जावेद शेख यांचीही बदली लातूरला झाल्यानंतर नव्याने आलेल्या उपशिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्याकडे स्वामी यांनी पदभार सोपविला. आता महिन्याभरातच शालेय शिक्षण विभागाने या तीन प्रभारी अधिकाऱ्यांच्या नंतर जिल्हा परिषद माध्यमिक विभागाला नवीन पूर्णवेळ शिक्षणाधिकारी मिळाला आहे. राम सातपुते यांनी अधिवेशनामध्ये सोलापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाचा कारभार चव्हाट्यावर आणत चौकशी करण्याची मागणी केली होती.

थम्सअपमध्ये ॲसीड मिसळून इसमाची आत्महत्या

सोलापूर : ॲसिड मिसळून शीतपेय प्राशन करून एका ४० वर्षीय इसमाने आत्महत्या केली. ही घटना विडी घरकुल परिसरातील सग्गम नगरात घडली.

सादिक अ.रजाक शेख (वय ४० रा. विडी घरकुल,हैदराबाद रोड) असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. आज सकाळी ११ वाजेच्या सुमारास त्याने सग्गम नगर येथील घरामध्ये थम्सअप या शितपेयात ॲसिड मिसळून प्राशन केले होते. त्याचा भाऊ मुबीन यांनी त्याला रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान सुमारास मयत झाला.

गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

सोलापूर : बाबुळगाव (ता.इंदापूर) येथे राहणाऱ्या दिपाली राहुल कांबळे (वय २१) या विवाहितेने घरात गळफास येऊन आत्महत्येचा प्रयत्न केली. तिने पत्र्याच्या रूम मधील छताच्या पाईपला साडीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून (पती) राहुल यांनी रुग्णालयात दाखल केले.

गावडी दारफळ येथे गॅसच्या भडक्याने महिलेचा भाजून मृत्यू

सोलापूर: स्वयंपाकासाठी गॅस चालू करताना अचानक आगीचा भडका उडाल्याने महादेवी शिवाजी गवसाने (वय ६५ रा.गावडी दारफळ ता.उत्तर सोलापूर) ही वृध्द महिला भाजून मयत झाल्या.

ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. महादेवी गवसाने या दुपारी १२ वाजेच्या सुमारास गॅस पेटवला होता. त्यावेळी आगीचा भडक्याने हा प्रकार घडला होता. त्यांना विनोद (मुलगा) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारादरम्यान दुपारी मयत झाल्या.या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आह

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

तुझ्यासाठी सखे हा चंद्र जवळ आणिला !!!

कल्याण
300-39-388

मेन बाजार
160-77-458

'समृध्दी' वर २० मजुरांवर काळाचा घाला

गर्डर आणि क्रेन कोसळले; ठाणेजवळील शहापूरची घटना

सुराज्य/ठाणे

ठाण्याजवळील शहापूर तालुक्यातील सरलांबे गावाजवळ खुटाडी येथे दुर्देवी घटना घडली आहे. तब्बल १०० फूट उंच व सव्वा दोन किमी लांबीच्या पुलाचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू असताना गर्डर लाँचर करताना तांत्रिक कारणामुळे अचानक कोसळला व २० कामगारांचा यामध्ये मृत्यू झाला. तर तीन कामगार गंभीर जखमी झाले आहेत. हे सर्व कामगार उत्तरप्रदेश, बिहार, तामिळनाडू असे परप्रांतीय होते अशीही माहिती समोर आली आहे. समृध्दी महामार्गावर अपघातांचे सत्र सुरूच आहे. बुलढाण्यात झालेल्या अपघाताला एक महिना उलटत नाही तोवर समृध्दीवर दुसरा अपघात झाला आहे.

अपघाताच्या ठिकाणाहून शहापूर उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. मध्यरात्री मंत्री दादा भुसे उपस्थित होते. उपजिल्हा रुग्णालयात जखमी रुग्णांची विचारपूस केली. तसेच शहापुरातील खासगी जीव रक्षक दल व सरलांबे येथील तरुण अपघातस्थळी मदत करत असल्याचे दिसून आले. एनडीआरएफचं पथक पण दुर्घटना स्थळी पाचारण करण्यात आलं. या दुर्घटनेत ज्यांनी आपला जीव गमावल त्यांच्या कुटुंबियांप्रती माझ्या संवेदना, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मृतांनी श्रध्दांजली अर्पण केली. अपघातात मृत झालेल्यांच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय सहाय्यता निधीतून दोन २ लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे. तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत केली जाणार असल्याची माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. या प्रकरणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे ही घटना अत्यंत दुर्देवी असून आम्ही शासनातर्फे मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत जाहीर केली आहे असंही जाहीर केलं. या दुर्देवी अपघाताची दखल राज्याच्या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी घेतली असून त्यासंदर्भात त्यांनी ट्वीट केलं आहे.

स्थानिक कंत्राटदाराविरुध्द गुन्हा दाखल

नवयुगा इंजीनियरिंग कंपनीचे स्थानिक कॉन्ट्रॅक्टर आणि गर्डर लॉन्च करणाऱ्या व्ही एस एल कंपनीच्या स्थानिक कॉन्ट्रॅक्टर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहापूर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ३०४ अ, ३३७, ३३८ आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कंपनीच्या कॉन्ट्रॅक्टरच्या निष्काळजी आणि हलगर्जीपणामुळं कामगारांचा मृत्यू झाला आहे. कामगारांच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी असलेल्या प्रेम प्रकाश साव यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कसा झाला अपघात?

मिळालेल्या माहितीनुसार, गर्डर मशीनला जोडणारी क्रेन आणि स्लॅब तब्बल शंभर फूट उंचावरुन मजुरांवर कोसळला. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १६ मृतदेह शाहपूर उप जिल्हा रुग्णालयात आणले आहेत. तीन ते चार जण जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. मृतांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे